अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शुक्रवार
०६.११.२०२६

वरुड
दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २७७ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

काल पवार-पटेल भेट, आज तटकरेंचं राष्ट्रवादीच्या विलिनीकरणावर रोखठोक भाष्य

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्य सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबद्दल मोठं भाष्य केलं आहे. अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसले असते, असं सुनील तटकरे म्हणाले. इतकंच नाही तर अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली, मात्र अजित पवार असते तर जी १२ फेब्रुवारीही तारीख जी सांगितली जाते ती निश्चित झाली असती आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र दिसल्या असत्या, असंही सुनील तटकरे म्हणाले. नुकतंच राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल यांनी शरद पवार यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली होती. या भेटीनंतर प्रफुल पटेल यांनी आम्ही राजकीयदृष्ट्या दुरावलो आहोत पण मनाने नाहीत असं वक्तव्य केलं होतं. आता यानंतर सुनील तटकरे यांनी विलिनीकरणावर भाष्य केल्याने, राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आलं आहे.

सुनील तटकरे नेमकं काय म्हणाले? दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाची सध्या तरी कुठलीच चर्चा नाही. पण अजितदादा असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस आज एकत्र दिसल्या असत्या. अजित पवार यांच्या निधनामुळे ही चर्चा मागे पडली. अजित पवार असते तर जी १२ फेब्रुवारी ही तारीख जी सांगितली जाते ती निश्चित झाली असती. मी त्यांच्या जवळचा सहकारी असल्याने दादांनी मला याबाबत सांगितलं होतं. दादा असते तर हे विलिनीकरण पाहता आले असते.

शशिकांत शिंदे यांची प्रतिक्रिया दरम्यान, याबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी एबीपी माझाला प्रतिक्रिया दिली. शशिकांत शिंदे म्हणाले, 'सुनील तटकरेंनी सत्य परिस्थिती सांगितली. अजित पवार असताना विलिनीकरणाची चर्चा झाली होती. आज तटकरे म्हणत असले तरी आम्ही याबाबत यापूर्वीच आम्ही बोलत होतो, पण ती मानलं जात नव्हतं. ते तटकरे साहेब बोलल्यामुळे त्यावर शिक्कामोर्तब झालं. आज दोन्ही पक्ष एकत्र असते तर महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, महानगरपालिका वगैरेचं चित्र वेगळं दिसलं असतं. दादांनाही तेच अपेक्षित होतं. पक्ष मजबुतीने ताकदीने उभा राहण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यायला हव्यात हे शरद पवार आणि अजित पवारांना अपेक्षित होतं. त्या दृष्टीनं च विलिनीकरणाची चर्चा झाली होती.

दोन्ही राष्ट्रवादीत नेमकं काय घडतंय? १९ ऑक्टोबरला सर्वात आधी पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार हे गृहमंत्र्यांना भेटायला गेले. त्यावेळी पक्षातील इतर कोणतेही नेते त्यांच्या बरोबर नव्हते. पुन्हा एक दिवस आड म्हणजे २१ तारखेला सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री यांची भेट घेतली. या भेटी नंतर २३ तारखेला पक्षातील प्रफुल्ल पटेल सुनिल तटकरे, छगन भुजबळ या नेत्यांची सुनेत्रा पवार यांच्या बरोबर बैठक झाली.

२५ तारखेला सकाळी कोअर कमिटीची बैठक होऊन त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांना भेटण्याचे ठरले.

कर्मभूमी एक्स्प्रेसला भीषण आग!

चार डबे आगीच्या विळख्यात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



पंजाब/राजपुरा - पंजाबमधील राजपुरा परिसरात कर्मभूमी एक्स्प्रेसला आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

सराय बंजारा आणि बसंतपुरा रेल्वे स्थानकादरम्यान धावत्या ट्रेनच्या चार डब्यांना आग लागल्याने प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. डब्यांमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडू लागल्याने प्रवाशांनी जीव वाचवण्यासाठी तातडीने ट्रेनमधून खाली उतरण्यास सुरुवात केली. सुदैवाने, लोको पायलटच्या प्रसंगावधानामुळे ट्रेन वेळेत थांबवण्यात आली आणि मोठा अनर्थ टळला.

दुपारी १.१० वाजता आगीची घटना मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अमृतसरहून न्यू जलपाईगुडीकडे जाणाऱ्या १२५०८ क्रमांकाच्या कर्मभूमी एक्स्प्रेसमध्ये दुपारी सुमारे १ वाजून १० मिनिटांनी आग लागली. राजपुरापासून अंदाजे १५ किलोमीटर अंतरावर बसंतपुरा रेल्वे स्थानकाजवळ ही घटना घडली.

ट्रेनच्या इंजिनाकडून पाचव्या डब्यात आग लागल्याची माहिती समोर आली. त्यानंतर आग इतर डब्यांपर्यंत पसरल्याने एकूण चार डबे आगीच्या तडाख्यात सापडल्याचे सांगण्यात येत आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन ट्रेन तातडीने थांबवण्यात आली.

लोको पायलटच्या प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला

ट्रेनला आग लागल्याचे लक्षात येताच लोको पायलटने प्रसंगावधान राखत गाडी थांबवली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली. अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आल्याची माहिती आहे. प्राथमिक माहितीनुसार, शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या घटनेनंतर परिसरात धुराचे मोठे लोट पसरले होते. दूरवरूनही धुराचे ढग दिसत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

योजनांचा लाभ आधार कार्डवर नाही, तर मतदार ओळखपत्रावर ठरणार

गांधी मोदी सरकारमधील मंत्र्यांचा व्हिडिओ शेअर करत :'हा कट खूप खोलवर रुजलाय, काळजीपूर्वक समजून घ्या..'

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई - लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आधारऐवजी मतदार ओळखपत्राद्वारे सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांची ओळख पटवण्याबाबतच्या लल्लन सिंह यांच्या वक्तव्यावरून हल्लाबोल केला आहे. सरकारची तयारी मतदार यादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेशी जोडली असल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल म्हणाले की, जर एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तर ती व्यक्ती सरकारी योजनांच्या लाभांपासूनही वंचित राहू शकते. त्यांनी या योजनेला निवडणुका जिंकण्याची नव्हे, तर मते चोरण्याची योजना म्हटले आहे. 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, मोदी सरकारमधील एका मंत्र्याने घोषणा केली आहे की, सरकारी योजनांचे लाभ आता आधारवरून नव्हे, तर मतदार ओळखपत्राद्वारे निश्चित केले जातील.

या निर्णयामागील संपूर्ण परिणाम जाणून घेणे आवश्यक असल्याचे सांगत राहुल गांधी यांनी लोकांना सावध केले. पोस्टमध्ये, राहुल गांधी यांनी डखठ योजनेचा मुद्दा उपस्थित केला आणि आरोप केला की, या योजनेच्या नावाखाली कोट्यवधी लोकांची नावे मतदार यादीतून वगळली जात आहेत. त्यांनी दावा केला की, यापैकी बहुतेक लोक असे आहेत ज्यांच्या मनात भाजपबद्दल नाराजी आहे.

त्यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना लक्ष्य करत राहुल यांनी आरोप केला की, निवडणूक आयोग आता मोदी सरकारच्या प्रभावाखाली काम करत आहे. त्यांनी भाजपसोबत संगनमत आणि मतचोरीचे आरोप पुन्हा केले.

अजित पवार असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या असत्या : सुनील तटकरेंचे वक्तव्य

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू असताना अजित पवार यांचे निधन झाल्याने हा विषय मागे पडला. मात्र, अजित पवार आज हयात असते, तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्या असत्या आणि त्यासाठी १२ फेब्रुवारी ही तारीखही निश्चित झाली असती, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले आहे. अजित पवार यांची दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत प्रखर इच्छा होती आणि त्या दिशेने त्यांची तयारीही सुरू होती, असे तटकरे यांनी स्पष्ट केले. विलीनीकरणाच्या चर्चेबाबत बोलताना तटकरे म्हणाले की, अजित पवार यांचे जवळचे सहकारी असल्याने त्यांनी या विषयावर आपल्याशी चर्चा केली होती. विलीनीकरणाबाबत त्यावेळी निश्चितपणे चर्चा झाली होती. त्यासंदर्भात अजित पवार यांनी आपल्याला विश्वासात घेतले होते. विलीनीकरणाची प्रक्रिया कोणत्या पद्धतीने पार पडेल, याबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट केली होती.

अजित पवार यांची तीव्र इच्छाशक्ती आणि त्यांनी आपल्याशी केलेली चर्चा पाहता, १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाचा निर्णय प्रत्यक्षात आला असता, असे तटकरे म्हणाले. अजित पवार यांच्या निधनामुळे विलीनीकरणाचा हा विषय त्याच टप्प्यावर थांबला. ते आज असते, तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित दिसल्या असत्या, असेही तटकरे म्हणाले.

उसाची ट्रॉली उलटली : आई ठार, मुलगा गंभीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



कराड - ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टरची ट्रॉली दुचाकीवर पलटी झाल्याने झालेल्या भीषण अपघातात आईचा जागीच मृत्यू झाला, तर मुलगा गंभीर जखमी झाला. सुदैवाने दुचाकीवरील सून वेळीच बाजूला पळाल्याने बचावली. गुरुवारी सकाळी सुमारे दहाच्या सुमारास पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील ढेबेवाडी फाटा, आगाशिवनगर येथील कोणार्क पार्कसमोर ही घटना घडली. मालन मोहन सुतार (६०) असे मृत महिलेचे नाव असून, यशवंत मोहन सुतार (२८) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी ट्रॅक्टर चालक युवराज पवार (२१) याच्याविरुद्ध कराड शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चचेगाव येथून ऊस घेऊन कृष्णा कारखान्याकडे निघालेल्या ट्रॅक्टरसमोर अचानक दुचाकी आल्याने चालकाने ब्रेक मारला. त्यामुळे मागील ट्रॉलीचा तोल जाऊन ती सुतार कुटुंबाच्या दुचाकीवर पलटी झाली. नागरिकांनी तातडीने मदतकार्य करून दोघांना बाहेर काढले. दरम्यान, कोणार्क पार्कजवळील रस्त्यालगतच्या फटाक्यांच्या स्टॉलमुळेही अपघाताचा धोका असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.



दुष्काळग्रस्तांसाठी काय उपाययोजना? हायकोर्टाचा सरकारला सवाल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – दुष्काळग्रस्त भागातील भूमिहीन मजूर आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली.

मुख्य न्यायाधीश महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायाधीश अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने दुष्काळग्रस्तांसाठी राबवल्या जाणाऱ्या सर्व योजनांची सविस्तर माहिती आणि कागदपत्रे १८ नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे निर्देश सरकारला दिले.

ग्रामीण भागातील कामगार, भूमिहीन मजूर, अल्पभूधारक शेतकरी आणि स्थलांतरित मजुरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्वाभिमानी मजदूर संघटनेच्या वतीने वरिष्ठ वकील मिहीर देसाई आणि वकील देवयानी कुलकर्णी यांच्यामार्फत जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची मुख्य न्यायाधीश महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायाधीश अद्वैत सेठना यांच्या खंडपीठा समोर सुनावणी झाली. यावेळी खंडपिठाने राज्यभरातील दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य सरकारने केलेल्या सर्व योजनांचा तपशील सादर करण्याचे निर्देश ॲडव्होकेट जनरल डॉ. मिलिंद साठे यांना दिले. या प्रकरणाची सुनावणी १८ नोव्हेंबरला होईल.

एफडीएच्या कारवाईला डिजिटल पुराव्यांचे बळ : आठ ते नऊ महिन्यांत नवी यंत्रणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – अन्नभेसळ आणि निकृष्ट दर्जाच्या औषधांची विक्री करणाऱ्यांविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आता डिजिटल पुराव्यांचा आधार घेण्याचा निर्णय घेतला आहे. छापे आणि तपासणीच्या प्रक्रियेचे चित्रीकरण करण्यापासून ते अन्न व औषधांचे नमुने गोळा करण्याच्या प्रक्रियेची नोंद ठेवण्यापर्यंत सर्व बाबींचे डिजिटल स्वरूपात दस्तऐवजीकरण करण्यात येणार आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या काही महिन्यांत राज्यभरात ९०० हून अधिक छापे टाकण्यात आले आहेत. मात्र, या कारवाईला कायदेशीरदृष्ट्या भक्कम आधार देण्याचे आव्हान आता एफडीएसमोर आहे. प्रत्येक छाप्याचे योग्य दस्तऐवजीकरण, वैज्ञानिक पुरावे, प्रयोगशाळांचे अहवाल आणि कायदेशीर प्रक्रियेचे पालन सुनिश्चित करणे आवश्यक आहे. तपासातील किंवा खटला चालविण्यातील त्रुटींमुळे अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणारे आरोपी सुटू नयेत, यासाठी प्रशासनाला विशेष दक्षता घ्यावी लागणार आहे. डिजिटल पुराव्यांच्या वापरामुळे तपास अधिकाऱ्यांना छापे किंवा तपासणीदरम्यान नेमके काय घडले, याची विश्वासार्ह नोंद ठेवता येणार आहे. छायाचित्रे, व्हिडीओ चित्रीकरण, घटनास्थळाचे लोकेशन, वेळेची नोंद आणि जप्तीच्या प्रक्रियेचे डिजिटल दस्तऐवजीकरण यामुळे कारवाई कुठे आणि केव्हा झाली, तसेच पुरावे कशा पद्धतीने गोळा करण्यात आले, हे स्पष्ट करता येईल. त्यामुळे पुराव्यांच्या सत्यतेबाबत निर्माण होणारे वाद टाळण्यास, त्यांच्याशी छेडछाड होण्याची शक्यता कमी करण्यास आणि न्यायालयात सरकारी पक्षाची बाजू अधिक प्रभावीपणे मांडण्यास मदत होईल.

गोकुळचा वाद शिगेला! 'गोकुळ'ला 'अमूल'च्या घशात घालण्याचे षडयंत्र - सतेज पाटील : कोल्हापुरात सोमवारी 'संघर्ष मोर्चा'

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई/कोल्हापूर – निवडणुकीत मिळालेला जनाधार डावलून राज्य सरकारने गोकुळवर ४ शासननियुक्त (स्वीकृत) संचालक लादण्याचा निर्णय घेतल्यानंतर राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनीही या वादात उडी घेतल्यामुळे हा वाद आता आणखी पेटण्याची चिन्हे आहेत. ९ तारखेला कोल्हापूर येथे दसरा चौक येथून 'संघर्ष मोर्चा' काढण्याची घोषणा काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी केली. 'कोल्हापूर जिल्ह्यातील गोकुळ दूध उत्पादक संघाच्या निवडणुकीत दिलेला कौल नाकारण्याचे पाप करत गोकुळवर कब्जा मिळवण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने पाच अशासकीय संचालक नेमण्याचा घेतलेला निर्णय दुर्दैवी आहे. लोकशाही संपवून शेतकऱ्यांचा हा गोकुळ संघ अमूलच्या घशात घालण्यासाठी सर्व खटाटोप चालला आहे', असा आरोप काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी गुरुवारी येथे केला. गोकुळच्या पदार्थांवर 'अमूल'चे लेबल 'मी येताना गोकुळचे गुलाबजाम आणि श्रीखंड आणणार होतो. कारण गोकुळ या नावाचे पदार्थ शेवटचेच पाहून घ्या, उद्या त्यावर अमूलचे लेबल लावून गोकुळ संस्था त्यांच्या घशात घातली जाईल', असा दावाही सतेज पाटील यांनी केला.

सत्ता मिळवण्यासाठीच सुधारणा 'राज्य सरकारने सहकार कायद्यात केलेल्या बदलातून साखर कारखाने आणि जिल्हा बँकांना वगळण्यात आले आहे. फक्त गोकुळमधील सत्ता मिळवण्यासाठी ही सुधारणा करण्यात आली आहे. ही सुधारणा गोकुळपुरती मर्यादित राहणार नसून उद्या ती कोणत्याही संस्थेसाठी लागू होऊ शकते.

न्यू इंग्लिश हाय सेकंडरी स्कूल येथे

दीपोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





वरुड – न्यू इंग्लिश हाय सेकंडरी स्कूल येथे दीपोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी आकर्षक आकाशकंदील तयार करून, पणत्या व दिव्यांची सुंदर सजावट केली. तसेच विद्यार्थ्यांनी विविध आकारांचे आकर्षक किल्ले तयार करून आपल्या कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव दिला.

या निमित्ताने दीपसजावट, आकाशकंदील व किल्ले निर्मिती स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून शाळेचा परिसर प्रकाशमय व प्रसन्न केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि दिवाळीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन शाळेचे मुख्याध्यापक अशोक चौधरी यांनी केले तसेच पर्यवेक्षक प्रमोद केणे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दीपोत्सवाचा कार्यक्रम आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

'एसटी' कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी गोड; १० हजार रुपयांचा बोनस जाहीर

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील 'एसटी'च्या ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यंदा दिवाळी गोड होणार आहे. एसटी महामंडळाने प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान, पात्र कर्मचाऱ्यांना १२ हजार ५०० रुपये सण उचल आणि महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्के करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

एसटी महामंडळातील विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या बैठकीत सरनाईक यांनी हे निर्णय जाहीर केले. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. महामंडळ आर्थिक अडचणींचा सामना करत असतानाही कर्मचाऱ्यांच्या दिवाळीचा आनंद हिरावून घेता येणार नाही, असेही ते म्हणाले.

सानुग्रह अनुदान औदार्य नसून त्यांचा हक्क एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करणारे निर्णय घोषित केले. एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र मेहनत करून लाखो प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची सेवा देतात. त्यांच्या कष्टाची जाणीव ठेवून दिवाळीच्या सणानिमित्त त्यांना सानुग्रह अनुदान देणे हे केवळ औदार्य नसून त्यांचा हक्क आहे. या निर्णयामुळे महामंडळावर सुमारे १६० कोटी रुपयांचा आर्थिक भार पडणार असला, तरी कर्मचाऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, हे आमचे कर्तव्य आहे, असे सरनाईक यांनी सांगितले. 'वीज' कर्मचाऱ्यांना २० हजारांचा बोनस दिवाळीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वीज कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांनाही दिवाळी भेट मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सूत्रधारी कंपनीसह महावितरण, महानिर्मिती आणि महापारेषण या कंपन्यांमधील सुमारे ८६ हजार कर्मचारी, अभियंते आणि अधिकाऱ्यांना प्रत्येकी २० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले आहे. तर विद्युत सहाय्यकांना १४ हजार रुपयांचा बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

क्रीडा क्षेत्रात डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाची उत्तुंग भरारी

विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय स्पर्धेत चमकदार कामगिरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





शेंदूरजनाघाट– जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित येथील डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी पदकांची कमाई करत आपले क्रीडा कौशल्य सिद्ध केले आहे. महाविद्यालयातील बीए भाग दोनचा विद्यार्थी पियुष रामदास मसाने आणि प्रज्वल श्रीराम हरले यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या क्रॉसकंट्री संघात निवड झाली आहे. हे दोन्ही खेळाडू ७ नोव्हेंबर २०२६ रोजी मंगलोर विद्यापीठ, मंगलोर (कर्नाटक) येथे होणाऱ्या अखिल भारतीय क्रॉसकंट्री स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रवाना झाले आहेत. ही निवड महाविद्यालयासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

तसेच महाविद्यालयाचा बीए भाग एकचा विद्यार्थी साहिल सिंग याने तायक्वांदो स्पर्धेतील ५८ किलो वजन गटात सुवर्णपदक पटकावत प्रथम क्रमांक मिळविला. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या तायक्वांदो संघात निवड झाली आहे.

दरम्यान, पियुष रामदास मसाने याने मैदानी स्पर्धांमध्येही आपली चमक दाखविली. २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉन, १० हजार मीटर आणि ५ हजार मीटर अशा तिन्ही स्पर्धांमध्ये सुवर्णपदक मिळवून त्याने उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने त्याचा उत्कृष्ट मैदानी खेळाडू म्हणून गौरव केला. याशिवाय प्रज्वल श्रीराम हरले याने १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तर ५००० मीटर स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे, उपाध्यक्ष सतीश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे, ॲड.प्रभाकर सावरकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

मारोतराव घाटोळे यांचे निधन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – येथुन जवळच असलेल्या वाडेगांव येथील प्रतिष्ठीत नागरिक, महाराष्ट्र शासनाच्या शेतीनिष्ठ पुरस्काराने सन्मानित मारोतराव गोविंदराव घाटोळे यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी आज सकाळी ७.३० च्या सुमारास हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले.

त्यांच्या मागे प्रा.डॉ.सुरेश घाटोळे, रमेश व दिलीप अशी ३ मुले, सुना, नातवंड असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या ६ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता वाडेगांव येथील हिंदु स्मशानभुमि येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक व ग्रामवासियांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या कुटूंबामध्ये २ नातवंडे डॉक्टर असून १ नातु आय.आय.टी.इंजिनिअर तर एक प्राध्यापक आहे. त्यांच्या निधनाने वाडेगावमध्ये शोक व्यक्त केल्या जात आहे.



वरुड : जेष्ठ नगरसेवक सौरभ उर्फ मुन्ना तिवारी यांना वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना न.प.भाजपा गटनेता किरण सावरकर, बांधकाम सभापती जीवन मालपे, नरेंद्र उपरकर, नगरसेवक गौरव इंगळे, नितेश धुर्वे, ॲड.योगेश चौधरी, राजेंद्र काळे, स्वप्नील चौधरी व इतर.

संपादकीय

आयुष्य खूप सुंदर आहे, फक्त ते जगायची कला अवगत असायला हवी.

नेतान्याहूंचे पुनरागमन की लोकशाहीचा नवा अध्याय?

सत्तेची महत्त्वाकांक्षा, पॅलेस्टिनी जनतेचे भविष्य आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अस्तित्वापुढे उभे राहिलेले गंभीर प्रश्न! जगाच्या राजकारणात काही देशांचे निर्णय केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागतात. इस्रायल हा त्यापैकीच एक देश. पश्चिम आशियातील राजकीय संघर्ष, पॅलेस्टिनी जनतेचा स्वातंत्र्याचा प्रश्न, सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय संबंध या सर्व बाबी इस्रायलच्या राजकारणाशी जोडलेल्या आहेत. सध्या इस्रायलमध्ये सुरू असलेले सत्तासंघर्षाचे नाट्य केवळ एका पंतप्रधानाच्या राजकीय भवितव्याचा प्रश्न नाही, तर तेथील लोकशाहीच्या परिपक्वतेचीही परीक्षा आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे अनेक वर्षांपासून देशाच्या राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व राहिले आहेत. सत्ता टिकवण्याची राजकीय चतुराई, आक्रमक राष्ट्रवादी भूमिका आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर कठोर धोरण ही त्यांच्या राजकारणाची वैशिष्ट्ये मानली जातात. मात्र दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर कोणत्याही नेतृत्वासमोर जनतेच्या अपेक्षा, विरोधकांचे आव्हान आणि स्वतःच्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारण्याचे प्रश्न उभे राहतात. नेतान्याहूही त्याला अपवाद नाहीत. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या इस्रायलच्या संसदीय निवडणुकीने राजकीय समीकरणे बदलली आहेत. नेतान्याहू यांच्या लिकूड पक्षाला सर्वाधिक २७ जागा मिळाल्या असल्या, तरी त्यांच्या आघाडीला बहुमतासाठी आवश्यक असलेल्या ६१ जागा मिळालेल्या नाहीत. दुसरीकडे गादी आयझेनकोट यांच्या नेतृत्वाखालील विरोधी आघाडीसमोरही सरकार स्थापनेचे आव्हान आहे. अरब पक्षांनी मिळवलेल्या १९ जागांमुळे सत्तास्थापनेच्या गणितात त्यांचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे नेतान्याहू पुन्हा सत्तेत येणार की इस्रायलमध्ये नव्या नेतृत्वाचा उदय होणार, हा प्रश्न सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. मात्र या सत्तासंघर्षापेक्षा मोठा प्रश्न आहे तो इस्रायलमधील लोकशाहीचा. निवडणुकीत जनतेने दिलेला कौल स्वीकारणे, विरोधकांचा सन्मान करणे आणि सत्तांतराची प्रक्रिया शांततेत पार पाडणे ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. निवडणुकीच्या निकालांबाबत शंका उपस्थित करणे हा राजकीय प्रक्रियेचा भाग असू शकतो; मात्र पुराव्याशिवाय आरोप करून जनतेच्या मतदान प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत करणे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. या राजकीय घडामोडींच्या केंद्रस्थानी पॅलेस्टिनी जनतेचा प्रश्नही आहे. अनेक दशकांपासून पॅलेस्टिनी नागरिकांना सुरक्षितता, स्वातंत्र्य, सन्मान आणि स्वतंत्र राजकीय अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. गाझा आणि पश्चिम किनारपट्टीवरील परिस्थितीने जगाचे लक्ष वेधले आहे. सामान्य नागरिकांचे जीवन, मुलांचे भविष्य, आरोग्यसेवा, शिक्षण आणि निवाऱ्याचा प्रश्न हा कोणत्याही राजकीय चर्चेपेक्षा मोठा आहे.



धनाची टोपली तुमच्या सोबत असावी : धनत्रयोदशी विशेष

धनत्रयोदशी... दिवाळीच्या सणाची खरी सुरुवात ज्या दिवसापासून होते तो मंगल दिवस. आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील त्रयोदशीला येणारा हा सण केवळ धनाचा नाही, तर आरोग्य, समृद्धी आणि आनंदाचा सण आहे.


या दिवशी लोक सोने, चांदी, भांडी, नवीन वस्तू खरेदी करतात. यामागे अशी श्रद्धा आहे की या दिवशी खरेदी केलेले धन तेरा पटीने वाढते. पण खरा विचार केला तर धनाची टोपली म्हणजे केवळ सोने-नाणे नाही.

धनाचे खरे तीन प्रकार आहेत.

पहिले धन – आरोग्य धन

धनत्रयोदशी हा भगवान धन्वंतरी यांचा जन्मदिवस. आयुर्वेदाचे जनक धन्वंतरी हे आरोग्याचे देवता मानले जातात. म्हणून या दिवशी आरोग्याची पूजा केली जाते.

विचार करा, जर तब्येतच बरी नसेल तर सोन्याच्या टोपलीचा काय उपयोग? 'पहिले सुख निरोगी काया, दुसरे सुख घरात असेल माया.'



दुसरे धन – लक्ष्मी धन

संध्याकाळी देवी लक्ष्मी आणि कुबेर देवाची पूजा केली जाते. घराची स्वच्छता करून, दिवे लावून लक्ष्मीचे स्वागत केले जाते. लक्ष्मी म्हणजे केवळ पैसा नाही, तर घरातील शांती, समाधान आणि सकारात्मक ऊर्जा.

'धन कमावणे हातात आहे, पण ते टिकवणे संस्कारात आहे.'

तिसरे धन – कर्म धन

याच दिवशी यमराजासाठी दिवा लावण्याची प्रथा आहे, ज्याला यम दीपदान म्हणतात. याचा अर्थ आपण आपल्या कर्माची जाणीव ठेवावी. चांगले कर्म हेच सर्वात मोठे धन आहे जे शेवटपर्यंत सोबत राहते.

'माणूस पैशाने नाही, तर विचाराने श्रीमंत होतो.'

धनतेरस आपल्याला काय शिकवते?

हा सण आपल्याला शिकवतो की, खर्च करण्यापेक्षा बचत महत्त्वाची. आज एक रुपया वाचवला तर उद्या तो आपल्या कठीण काळात उपयोगी येईल. पण त्याच बरोबर कंजूषपणा करू नये. धन हे वाहते पाणी आहे, ते थांबवले तर गढूळ होते आणि वाहू दिले तर स्वच्छ राहते.

म्हणूनच दानधर्म करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या धनातून थोडा भाग गरजूंना दिला तर त्या धनाला खरे पुण्य लागते. या धनत्रयोदशीला आपण एक संकल्प करूया. सोन्या-चांदीची टोपली तर भरूच, पण त्यासोबत

आरोग्याची टोपली – रोज व्यायाम आणि सकस आहाराने भरूया.

नात्यांची टोपली – प्रेम, विश्वास आणि आदराने भरूया.

ज्ञानाची टोपली– चांगले विचार आणि पुस्तकांनी भरूया.

जेव्हा या तिन्ही टोपल्या भरलेल्या असतील, तेव्हाच पैशाच्या टोपलीला खरा अर्थ येईल.

या दिवाळीत तुमच्या घरात लक्ष्मीचा वास राहो, तुमचे आरोग्य अबाधित राहो आणि तुमच्या सोबत नेहमी धनाची, आनंदाची आणि समाधानाची टोपली असावी, हीच मनापासून शुभेच्छा!

शुभ धनत्रयोदशी!



शेषराव गोपाळ कडू
वरुड

भीमाशंकरचे जंगल वाचवा! विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी किती दिवस?

३२ हजारांहून अधिक वृक्षतोडीचा मुद्दा ऐरणीवर; पर्यावरणीय मंजुरी, ग्रामसभांचे अधिकार आणि प्रकल्पांच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न!

महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वतरांगांमध्ये निसर्गाने मुक्तहस्ताने सौंदर्याची उधळण केली आहे. घनदाट जंगल, डोंगरदऱ्या, नद्या, वन्यजीव आणि जैवविविधतेने समृद्ध असलेला भीमाशंकर परिसर हा केवळ पर्यटनाचे ठिकाण नाही, तर पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा नैसर्गिक वारसा आहे. मात्र याच परिसरालगत प्रस्तावित जलविद्युत पंप स्टोरेज प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्यावरण संवर्धनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

विकास आवश्यक आहे, वीज आवश्यक आहे आणि वाढत्या ऊर्जेच्या मागणीची पूर्तता करणेही काळाची गरज आहे. परंतु विकासाचा मार्ग निवडताना निसर्गाचा विनाश हा त्याचा अपरिहार्य भाग मानणे कितपत योग्य आहे? हा प्रश्न आज प्रत्येक सुजाण नागरिकाने विचारण्याची वेळ आली आहे.

कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवरचा तीन हजार मेगावॅट क्षमतेचा पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी सुमारे २३३ हेक्टर वनजमिनीचा वापर आणि ३२ हजार ४९० वृक्षतोडीला मंजुरी मिळाल्याचे वृत्त समोर आले आहे. या वृक्षतोडीमुळे सह्याद्रीच्या जैवविविधतेवर, वन्यजीवांच्या अधिवासावर आणि स्थानिक नागरिकांच्या जीवनमानावर परिणाम होण्याची भीती पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

या प्रकरणात कंपनीची बाजूही समजून घेणे आवश्यक आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार प्रकल्प भीमाशंकर अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असून अभयारण्य आणि पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या बाहेर आहे. प्रकल्पासाठी आवश्यक वैधानिक परवानग्या मिळाल्या असून पर्यावरणीय उपाययोजनांचा भाग म्हणून वृक्षारोपणाची योजनाही आखण्यात आली आहे. कंपनीने सुमारे ६० हजार वृक्ष लावण्याचे नियोजन केले असून वनविभागाच्या माध्यमातून आणखी ३० हजार वृक्ष लावण्याची योजना असल्याचे सांगितले आहे. मात्र या दाव्यांची स्वतंत्र आणि सार्वजनिक पडताळणी होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

वृक्षतोडीच्या बदल्यात वृक्षारोपण हा पर्याय असू शकतो; पण तो जंगलाचा पर्याय होऊ शकत नाही!

कारण एखादे जुने जंगल म्हणजे केवळ झाडांची संख्या नसते. त्या जंगलात अनेक वर्षांत निर्माण झालेली जैवविविधता, पक्ष्यांची घरटी, प्राण्यांचे अधिवास, औषधी वनस्पती, जमिनीतील ओलावा आणि पाण्याचे नैसर्गिक स्रोत यांचा समावेश असतो. आज हजारो रोपे लावली तरी जुन्या जंगलाची परिसंस्था लगेच निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे किती झाडे लावली जाणार यापेक्षा किती जुने जंगल नष्ट होणार आणि त्याची भरपाई प्रत्यक्षात कशी होणार, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे.



भीमाशंकर परिसर हा शेकरू, बिबट्या, मोर आणि विविध वन्यजीवांसाठी महत्त्वाचा अधिवास आहे. जंगलातील झाडांची संख्या कमी झाली, तर वन्यजीवांच्या अन्नसाखळीवर आणि त्यांच्या नैसर्गिक भ्रमणमार्गांवर परिणाम होऊ शकतो. जंगलाचा ऱ्हास झाला तर त्याचे परिणाम केवळ वन्यजीवांपुरते मर्यादित राहत नाहीत. पावसाचे पाणी जमिनीत मुरणे, मातीची धूप रोखणे आणि जलस्रोतांचे संवर्धन या नैसर्गिक प्रक्रियांवरही परिणाम होण्याची शक्यता असते.

ग्रामसभेचा आवाज कायद्यांतर्गत अधिकार, पर्यावरणीय जनसुनावणी आणि संबंधित परवानग्या यांची वस्तुस्थिती जनतेसमोर आली पाहिजे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या मंजुरीची आवश्यकता लागू आहे का, लागू असल्यास मंजुरी कोणत्या अटींवर मिळाली, याचीही स्पष्ट माहिती प्रसिद्ध झाली पाहिजे.

वीज खरेदी करार, प्रकल्पाचा आर्थिक आराखडा, कंपन्यांना दिलेल्या सवलती, वनजमिनीच्या वापरासंबंधीचे आदेश आणि वृक्षतोडीची अचूक संख्या या सर्व बाबी सार्वजनिक केल्या पाहिजेत. माहितीच्या अभावामुळे निर्माण होणारा संभ्रम दूर करण्यासाठी शासनाने सर्व कागदपत्रांसह वस्तुस्थिती स्पष्ट करणे गरजेचे आहे.

पंप स्टोरेज प्रकल्प की पर्यावरणीय कसोटी? पंप स्टोरेज प्रकल्पांमुळे अतिरिक्त वीज उपलब्ध असताना पाणी उंच जलाशयात पंप करून साठवता येते आणि विजेची मागणी वाढल्यावर त्यातून पुन्हा वीजनिर्मिती करता येते. अक्षय ऊर्जेच्या वाढत्या वापरासाठी अशा प्रकल्पांची भूमिका महत्त्वाची असू शकते. मात्र त्यासाठी होणारा वनजमिनीचा वापर, पाण्याची उपलब्धता, स्थानिक जैवविविधता आणि पर्यावरणीय परिणाम यांचे स्वतंत्र मूल्यमापन आवश्यक आहे.

विकासाच्या नावाखाली प्रत्येक प्रकल्पाला सरसकट विरोध करणे योग्य नाही; पण केवळ गुंतवणूक आणि वीजनिर्मितीचे आकडे दाखवून पर्यावरणीय प्रश्नांकडे दुर्लक्ष करणेही योग्य नाही. विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखणे हीच खरी कसोटी आहे.

म्हणूनच भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीबाबत संपूर्ण माहिती सार्वजनिक करावी. सर्व परवानग्या, पर्यावरणीय अहवाल, वन्यजीवविषयक मंजुरी, ग्रामसभांचे ठराव आणि वृक्षारोपणाच्या अंमलबजावणीचा तपशील जनतेसमोर ठेवावा. स्वतंत्र तज्ज्ञ समितीमार्फत प्रत्यक्ष पाहणी करून पर्यावरणीय परिणामांचा आढावा घ्यावा. आवश्यक माहितीची पडताळणी आणि कायदेशीर प्रक्रियेचे परीक्षण पूर्ण होईपर्यंत वादग्रस्त वृक्षतोडीच्या कामाला स्थगिती देण्याच्या मागणीचाही गांभीर्याने विचार व्हावा.

शेवटी एकच प्रश्न उरतो : विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाकडून घेतच राहणार आहोत की पुढच्या पिढ्यांसाठी काही हिरवे राखूनही ठेवणार आहोत?

वीज प्रकल्प उभारता येतील, रस्ते बांधता येतील, उद्योग उभे करता येतील; पण एकदा नष्ट झालेले नैसर्गिक जंगल पुन्हा पूर्वीसारखे निर्माण करण्यासाठी अनेक दशके लागतात. त्यामुळे भीमाशंकरचे जंगल हा केवळ एका प्रकल्पाचा विषय नाही, तर महाराष्ट्राच्या पर्यावरणीय भवितव्याचा प्रश्न आहे. शासनाने विकासाच्या आकड्यांइतकेच निसर्गाच्या हानीचेही गणित मांडले पाहिजे. कारण वीज माणसाचे जीवन उजळवते; पण जंगलच नष्ट झाले, तर त्या उजेडाचे भविष्य कोण जपणार?

निसर्ग वाचला तरच विकास टिकेल; अन्यथा विकासाच्या नावाखाली आपण भविष्यातील पिढ्यांसाठी केवळ उजाड डोंगर आणि आठवणींचे जंगल सोडून जाऊ! निसर्गसंपत्तीचा वापर करताना पर्यावरणीय जबाबदारीचे भान राखणे आवश्यक! भीमाशंकर परिसरातील वृक्षतोडीचा विषय केवळ काही हजार झाडे तोडण्यापुरता मर्यादित नाही. हा विषय सह्याद्रीच्या पर्यावरणीय संतुलनाशी, स्थानिक लोकांच्या उपजीविकेशी आणि भविष्यातील नैसर्गिक सुरक्षिततेशी संबंधित आहे. जंगल हे निसर्गाने मानवाला दिलेले सर्वात मोठे वरदान आहे. मात्र विकासाच्या नावाखाली या वरदानाचा ऱ्हास होत असेल, तर त्या विकासाच्या संकल्पनेचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक ठरते. आज जगभर हवामान बदलाचे परिणाम जाणवत आहेत. कुठे अतिवृष्टी, कुठे दुष्काळ, तर कुठे पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत जंगलांचे संवर्धन करणे ही केवळ पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नसून शासन, उद्योगजगत आणि सामान्य नागरिकांचीही सामूहिक जबाबदारी आहे. जंगलातील प्रत्येक झाड मातीची धूप रोखण्यास, पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यास आणि वातावरणातील तापमान नियंत्रित ठेवण्यास हातभार लावते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

उद्योजकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

जरुडच्या उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचा प्रेरणादायी उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





वरुड – जरुड येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचा अनावरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा जागर आणि सामाजिक कार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचा अनावरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गटशिक्षणाधिकारी दिलीप बुरंगे होते तर देवग्रामच्या अंतोदय मिशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष भास्कर विघे गुरुजी यांचे हस्ते हा सोहळा पार पडला. याप्रसंगी ग्रामगीताचार्य ह.भ.प.केशवराव भोंडे महाराज, बापूराव मेंढे, भास्करराव विघे, उत्क्रांती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र पाटील, उत्क्रांती सहकारी संस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांचे हस्ते संत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. यावेळी बापुराव मेंढे, केशवराव भोंडे यांची विशेष उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणारे जरुड येथील कुशल शेतकरी भिमराव वाडोदे, जिनिंग व प्रेसिंगचे उद्योजक राजेंद्र कुऱ्हाडे, राऊत सेलिब्रेशनचे उद्योजक नंदकिशोर राऊत, किराणा सुपर मार्केटचे राजु लाड, लाकडी फर्निचर व्यावसायिक सोपान बेलसरे, लाकडी तेलघाणी उद्योजक धीरज देशमुख यांचा सन्मान संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे यांचे हस्ते करण्यात आला.

यावेळी संचालक पुंडलिक हरले, डॉ.नितीन वानखडे, डॉ.सुशील पाटील, शामराव वानखडे, रमेशराव देशमुख, सुरेशराव कानडे, किरण शेरेकर, सुरेशराव खारोडे, डॉ.निळकंठ यावलकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामराव वानखडे यांनी केले. संतांचे विचार, सामाजिक बांधिलकी आणि उद्योजकांच्या कर्तृत्वाचा सन्मान साधण्याचा हा प्रातिनिधिक स्वरुपाचा सत्कार असल्याचे ते म्हणाले. उद्योजकांचा परिचय संचालक गजानन बिजवे, संचालन सी.टी.पठाण तर आभार रविंद्र वसुले यांनी मानले.

यशस्विते करिता सरव्यवस्थापक राजीव शेलकर, राजीव वाडबुधे, अंकुश वानखडे, ज्ञानेश्वर घोडकी, प्रमोद वाडोदे, प्रविण अंबाडकर, ऋषीकेश बनसोडकर, ओम नेरकर, अमोल कडू, योगेश तडस, गीतेश कढे, श्रीकांत गावंडे, श्रीकांत कानडे, सुनील राऊत यांनी सहकार्य केले. कार्यक्रमापूर्वी ग्रामीण गुरुदेव सेवा भजनी मंडळ यांनी राष्ट्रसंतांच्या भजनांचा कार्यक्रम सादर केला. अशा प्रेरणादायी उपक्रमातुन उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेने केवळ धार्मिक किंवा सांस्कृतिक कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता सामाजिक जाणीव, उद्योजकांचा सन्मान आणि समाजप्रबोधनाचा सुंदर संदेश दिला. या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

तिर्थक्षेत्र विकास आरखडयातील २० कोटींहून अधिक दुरुस्ती कामांना मंजुरी

मोझरी,कौंडण्यपूर आणि वलगाव विकास आराखडयांतर्गत होणार दुरुस्ती कामे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

अमरावती – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी,श्री.क्षेत्र कौंडण्यपूर आणि श्री.संत गाडगेबाबा वलगाव तिर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत २० कोटी १९ लाख ८५ हजार रुपयांच्या अत्यावश्यक दुरुस्ती कामांच्या प्रस्तावास राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मंजुरी दिली आहे.

मोझरी,कौंडण्यपूर आणि वलगाव येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत उभारण्यात आलेल्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चाधिकार समितीची बैठक पार पडली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव आबासाहेब नागरगोजे, दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, नियोजन विभागाच्या सह सचिव गीतांजली बाविस्कर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सचिन चिवटे बैठकीत उपस्थित होते.

या बैठकीत तीनही तिर्थक्षेत्र विकास आराखडयातील काम पूर्ण झालेल्या इमारतींच्या दुरुस्ती कामांचे व हस्तांतरणाबाबत अमरावती विभागीय आयुक्तांना सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार सादर प्रस्तावानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मोझरी तिर्थक्षेत्र विकास आरखडयांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यात्मिक संकुल, ग्राम विकास प्रबोधिनीसाठी,भक्त निवास, अति महत्वाच्या व्यक्तींकरिता विश्रामगृहाच्या १२ इमारतींची दुरुस्ती आणि या सर्व इमारतींना कायमस्वरुपी पाणी पुरवठयाची सोय करण्यासाठी एकूण १६ कोटी ५५ लाखाच्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे. श्री.क्षेत्र कौंडण्यपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत प्रसाधनगृह इमारत,पर्यटक विसावा इमारत, उपहारगृह इमारत, विश्रामगृह इमारत आणि पोहोच मार्गासाठी एकूण १ कोटी ८४ लाख २० हजार रुपयांच्या दुरुस्तीकामांना मंजुरी देण्यात आली आहे. संत गाडगेबाबा वलगाव तिर्थक्षेत्र विकास आराखडयातील अस्तीत्वातील इमारतींमध्ये सुविधा देण्यासाठी मुख्यत्वे आतील व बाहेरील रंगरंगोटी, परिसराची साफसफाई, आवश्यक फ्लोरींग तसेच इतर दुरस्ती, रेन वॉटर हार्वेस्टींग, पाणी पुरवठा,विद्युतीकरण अशा कामांसाठी १ कोटी ८० लाख ६५ हजारांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

विवाहितेच्या मानसिक व शारिरीक छळ प्रकरणी

पतीसह सासरकडील चौघांविरुध्द गुन्हे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

वरुड – विवाहितेच्या मानसिक व शारिरीक छळ प्रकरणी वरुड पोलिसांनी पतीसह सासरकडील चौघांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत.

फिर्यादी व आरोपी अंकुश पती-पत्नी असून आरोपी क्र.२ सासरे, क्र.३ सासु तर क्र.४ ननंद आहे. काही वर्षांपुर्वी फिर्यादीचे आरोपी अंकुश याचेसोबत लग्न झाले होते. लग्नानंतर काही दिवस फिर्यादी यांना सासरकडील मंडळींनी चांगली वागणुक दिली. त्यानंतर आरोपी यांनी फिर्यादी यांना वडिलांकडून व्यवसाय सुरु करण्याकरीता ५० लाख रुपये घेवुन ये, असे म्हणुन तगादा लावला, ५० लाख रुपये घेवुन ये तरच तुला घरात घेईल, असे म्हणुन फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ सुरु केला.

या प्रकरणी मन्नदुला अंकुश डाहाके (३२) रा.अमडापुर ता.वरुड यांचे फिर्यादीवरुन पती अंकुश विठठल डाहाके (३७), सासरे विठठल किसनराव डहाके (७२), सासु बेबी विठठल डहाके (६५), रोषनी सचिन तायडे (३९), सर्व रा.कांता नगर अमरावती यांचे विरुध्द कलम ८५, ३ (२) बी.एन.एस.२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास वरुड पोलिस करीत आहेत.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३
नाशिक	२६	२२
पुणे	३०	२१

भारतातील ग्रामीण भागात तीन प्रौढांपैकी एकाला उच्च रक्तदाब

टाटा मेमोरियलच्या अभ्यासातून निष्कर्ष

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – ग्रामीण भारतातील प्रत्येक तीन प्रौढ व्यक्तींपैकी एक व्यक्ती उच्च रक्तदाब असल्याचे एका अभ्यासातून समोर आले आहे.

मात्र, अत्यल्प रुग्णांनाच आपल्याला उच्च रक्तदाबाचा त्रास असल्याची जाणीव आहे. त्यामुळे उच्च रक्तदाबाचे निदान आणि उपचार व्यवस्थापनामध्ये मोठी दरी असल्याचे स्पष्ट झाले आहे. टाटा मेमोरियल सेंटरने बार्शी येथे सुमारे ४० हजार लोकांवर केलेल्या अभ्यासानुसार, उच्च रक्तदाबावरील औषधे घेणाऱ्या रुग्णांपैकी ३९ टक्के रुग्णांचा रक्तदाब नियंत्रणात होता.

हा अभ्यास 'एनपीजे कार्डिओव्हॅस्क्युलर हेल्थ' या स्प्रिंगर नेचरच्या सहकार्याने प्रकाशित होणाऱ्या खुल्या ऑनलाइन वैद्यकीय नियतकालिकात प्रसिद्ध झाला आहे. अभ्यासानुसार, सहभागी व्यक्तींपैकी ३१ टक्के जणांना उच्च रक्तदाब असल्याचे आढळले. यापैकी ६ टक्के व्यक्तींना यापूर्वीच आपल्या आजाराची माहिती होती, तर उर्वरित २५ टक्के व्यक्तींना उच्च रक्तदाब असूनही त्याची जाणीव नव्हती.

काँक्रीटीकरणासाठी ८,६१४ कोटी : तिसऱ्या टप्प्यात ३११ किमीचे रस्ते होणार सिमेंट काँक्रीटचे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – मुंबईकरांना खड्डेमुक्त आणि दीर्घकालीन टिकाऊ रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई महापालिकेने हाती घेतलेल्या सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्याची तयारी सुरु केली आहे. तिसऱ्या टप्प्यात ३११ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे ८६१४ कोटी ५५ लाख ५६ रुपये खर्च केले जाणार आहेत.

या कामाला जानेवारी २०२७ पासून सुरुवात करण्याचे उद्दिष्ट असल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. सध्या शहरात सिमेंट काँक्रीटीकरण प्रकल्पाचे पहिले आणि दुसरे टप्पे सुरू असून त्याअंतर्गत २१७९ रस्त्यांचे, म्हणजेच ७१५ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येत आहे. यापैकी १५८९ रस्त्यांवरील कामे पूर्ण झाली असून ३१६ रस्त्यांवरील कामे अंशतः पूर्ण झाली आहेत.

आरोग्यसेवेतील हलगर्जीपणा भोवला, नांदेडमध्ये ११ कर्मचाऱ्यांवर कारवाईचे आदेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – सरकारी रुग्णालयांमधील आरोग्यसेवेचा दर्जा आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सुरू केलेल्या आरोग्य संवाद यात्रेच्या पहिल्याच दिवशी नांदेडमध्ये कारवाईचा बडगा उगारला. लोहा, मुखेड, हिमायतनगर आणि सोनखेड या तालुक्यांतील आरोग्य संस्थांच्या पाहणीदरम्यान आरोग्यसेवेत हलगर्जीपणा आणि अकार्यक्षमता आढळल्याने ११ जणांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले. याशिवाय १० जणांच्या चौकशीचे आणि चार जणांच्या बदलीचे आदेशही देण्यात आले आहेत. आरोग्यमंत्री आबिटकर सध्या आरोग्य संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यातील विविध जिल्ह्यांना भेटी देत आहेत. या दौऱ्यांत जिल्हा आणि तालुका पातळीवरील दवाखाने तसेच रुग्णालयांना भेटी देऊन तेथील आरोग्य सुविधांचा आढावा घेतला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील पाहणीदरम्यान काही ठिकाणी आरोग्य यंत्रणेतील त्रुटी आणि रुग्णांना आवश्यक सेवा देण्यात येत असलेली दिरंगाई त्यांच्या निदर्शनास आली. या कारवाईत सहा डॉक्टर, दोन आयडीडब्ल्यू अभियंते, राष्ट्रीय आरोग्य अभियानातील दोन जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक (डीपीएम) आणि दोन तालुका आरोग्य अधिकारी यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे.

निदा खानला ३५ दिवस मदत करणारा इम्तियाज जलील मुख्य आरोपी -

संजय शिरसाट यांचा दावा : संपूर्ण कारस्थान जलील यांनी रचल्याचा आरोप

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – नाशिकमधील टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याच्या आरोपावरून एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. निदा खानला नाशिकमधून बाहेर काढण्यापासून ते छत्रपती संभाजीनगरमध्ये आणेपर्यंत आणि पुढील ३५ दिवस तिला मदत करण्यापर्यंतच्या घडामोडींमध्ये जलील यांची भूमिका असल्याचा आरोप सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केला. या प्रकरणातील मुख्य आरोपी जलीलच असून, त्यांना तुरुंगात जावे लागेल, असा दावाही त्यांनी केला.

निदा खानला नाशिकमधून पळवून मुंबर्यात नेण्यात आले आणि तेथून छत्रपती संभाजीनगरमध्ये आणण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत जलील यांनी मदत केल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. मतीन पटेल हा या प्रकरणातील मोहरा होता, तर संपूर्ण कारस्थान जलील यांनी रचल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे पोलिसांनी जलील यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्याचे शिरसाट म्हणाले. या प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी जलील यांचे व्हॉइस मेसेज आणि कॉलचे नमुने तपासले. त्यांची जुळवणी झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आल्याचे शिरसाट यांनी सांगितले. निदा खान सुमारे ३५ दिवस येथे राहत होती. तिची आई आणि मावशीही काही दिवस येथे राहिल्या होत्या. त्यांच्याशी जलील यांच्या सांगण्यावरून संवाद साधला जात होता, असा आरोपही त्यांनी केला. पोलिसांनी या प्रकरणाचा बारकाईने तपास केल्याचे सांगत शिरसाट यांनी तपास यंत्रणेचे अभिनंदन केले.

लक्षदीप हे उजळू दे चंद्रभागेच्या तिरी



पंढरपूर : दिवाळीच्या सणाला सुरुवात झाली असून काल वसुबारस नंतर आज धनत्रयोदशीचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत आहे. एकीकडे घरोघरी दिव्यांची उजळण पाहायला मिळत आहे, दुसरीकडे उंचच उंच इमारतीवर विद्युत रोषणाई आकर्षक ठरत आहेत.

केरळची 'माया' वनतारामध्ये दाखल; जामनगरच्या प्रवासासाठी खास विमानाची सोय, १८ महिन्यांच्या हत्तीच्या पिल्लावर होणार विशेष उपचार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वाशिम – केरळमधील 'अभयारण्यम' येथून १८ महिन्यांच्या 'माया' या हत्तीच्या पिल्लाला, विशेष उपचारांसाठी गुजरातच्या जामनगरमधील 'वनतारा' येथे स्थानांतरित करण्यात आले आहे. तिला अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले असून ती गंभीर आरोग्य समस्यांचा सामना करत असल्याची माहिती आहे. केरळचे मुख्य वन्यजीव वॉर्डन डॉ.पी.पुगाझेंदी यांनी पशुवैद्यकीय तज्ज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर ५ नोव्हेंबर २०२६ रोजी तिला हलवण्याचे आदेश दिले.

कर वनविभागाच्या अथक प्रयत्नांनंतरही, अनेक महिन्यांच्या उपचारानंतर आणि चोवीस तास देखरेख करूनही तिच्या प्रकृतीत सुधारणा न झाल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. 'वनतारा'मध्ये मायाला अतिदक्षता दिली जाईल, जिथे पशुवैद्यकांची एक टीम तिच्या प्रकृतीची तपासणी करून पुढील उपचारांच्या पर्यायांवर काम करेल. अशी माहिती आहे. दरम्यान, १९ एप्रिल २०२५ रोजी, मलयत्तूर विभागातील काप्रिक्काड (घरीळिज्ञरव) जवळ माया सापडली होती. तिचा कळप नदी ओलांडून गेल्यावर ती तिथे एकटीच राहिली होती. जन्माला आलेले हे पिल्लू अत्यंत अशक्त होते, त्याला तीव्र निर्जलीकरण (डिहायड्रेशन) झाले होते आणि तिला तिच्या आईचे पहिले दूधही मिळू शकले नव्हते. तिची आई परत न आल्यामुळे, वनविभागाने तिला वाचवून 'अभयारण्यम'मध्ये आणले.

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९७४/२०२६ **ने.ता.१६/१२/२०२६**

सिध्देश्वर देवराव वंजारी

वय अं.६३ वर्ष, धंदा- शेती

रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती **अर्जदार**

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत देवराव नत्थुजी वंजारी व शेवंताबाई देवराव वंजारी, रा.शेंदुरजनाघाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१६/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९७२/२०२६ **ने.ता.१९/१२/२०२६**

१) केशव बाळाभाऊ वंजारी, वय अं.७७ वर्ष, धंदा-शेती
२) सिध्देश्वर देवराव वंजारी, वय अं.६३ वर्ष, धंदा- शेती
अर्जदार क्र.१ रा.नरेंद्र नगर, नागपुर ता.जि.नागपुर
अर्जदार क्र.२ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत शामा नत्थुजी वंजारी, रा.शेंदुरजना घाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९७३/२०२६ **ने.ता.१७/१२/२०२६**

१) रंजना विजय शिरभाते, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम
२) पियांशु विजय शिरभाते, वय अं.१९ वर्ष, धंदा- शिक्षण
३) तिलक विजयराव शिरभाते, वय अं.४३ वर्ष, धंदा- शिक्षण
अर्जदार क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत दिगांबर महादेव वरुडकर, रा.शेंदुरजना घाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९९९/२०२६ **ने.ता.८/१२/२०२६**

१) सुभाष महादेवराव गोरडे, वय अं.६३ वर्ष, धंदा-शेती
२) हर्षल सुभाष गोरडे, वय अं.३३ वर्ष, धंदा- शेती
३) सविता अतुल खोडस्कर, वय अं.३० वर्ष, धंदा- घरकाम
अर्जदार क्र.१ ते ३ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत उषा सुभाष गोरडे, रा.शेंदुरजना घाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

नागपूरच्या मेयो रुग्णालयात पोलिसाकडून निवासी डॉक्टरला मारहाण : घटनेचा सीसीटीव्ही समोर, तरी डॉक्टरवरच गुन्हा! मार्ड संघटनेचा आक्रमक पवित्रा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर – नागपूरच्या इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय म्हणजेच मेयो रुग्णालयात ४ नोव्हेंबरला कर्तव्यावर असलेल्या निवासी डॉक्टराला पोलीस कर्मचारी आणि त्याच्या मुलाने मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेचे सीसीटीव्ही चित्रणही समोर आले आहे. विशेष म्हणजे, मारहाणीची तक्रार करणाऱ्या पीडित डॉक्टरवरच गुन्हे दाखल करण्यात आल्याचा आरोप महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सने केला आहे. मेयोच्या अपघात विभागात एका गंभीर रुग्णावरील उपचाराला प्राधान्य दिल्याने संतप्त झालेल्या पोलीस कर्मचारी आणि त्याच्या मुलाने डॉक्टरला मारहाण केल्याचे आरोप आहे. त्याची तक्रार देण्यासाठी डॉक्टरांनी तहसील पोलीस ठाण्यात धाव घेतली असता त्यांना सुमारे सहा तास बसवून ठेवण्यात आल्याचा आरोपही मार्डने केला आहे. त्यानंतर मारहाण करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल कर ताना डॉक्टरांवरही डांबून ठेवणे आणि जीवितास धोका निर्माण करणे, यांसारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आल्याचा मार्ड संघटनेचा आरोप आहे.. मागण्या मान्य न झाल्यास बेमुदत काम बंद आंदोलनाचा, राज्य मार्डने राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दरम्यान, या प्रकरणी निष्पक्ष तपास, आरोपींना अटक आणि संबंधित पोलीस कर्मचाऱ्याच्या निलंबनाची मागणी मार्डने केली आहे.

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.१०००/२०२६ **ने.ता.७/१२/२०२६**

१) निर्मला दिगांबर वरुडकर, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम
२) निलेश दिगांबर वरुडकर, वय अं.४५ वर्ष, धंदा- शेती
३) राजश्री संतोष गोलाईत, वय अं.४३ वर्ष, धंदा- घरकाम
४) ममता राजेश टिक्कस, वय अं.४० वर्ष, धंदा- घरकाम,
अर्जदार क्र.१ ते ४ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत दिगांबर महादेव वरुडकर, रा.शेंदुरजना घाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९८६/२०२६ **ने.ता.७/१२/२०२६**

१) मोहन मनोहरराव दळवी, वय अं.६० वर्ष, धंदा- सेवानिवृत्त, २) आशा गजानन कथलकर, वय अं.५५ वर्ष, धंदा- घरकाम, ३) उषा सुधाकर नेरकर, वय अं.४८ वर्ष, धंदा- घरकाम, ४) मनिषा गोपाल दळवी, वय अं.३९ वर्ष, धंदा- घरकाम,
अर्जदार क्र.१ रा.नागपुर, ता.जि.नागपुर
अर्जदार क्र.२ रा.परतवाडा, ता.अचलपुर, जि.अमरावती
अर्जदार क्र.३ रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.बेलखेड, ता.जि.अकोला – **अर्जदार**

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत मनोहर रघुनाथ दळवी व शांतबाई मनोहरराव दळवी, रा.शेंदुरजना घाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.७/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर,
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९८४/२०२६ **ने.ता.०९/१२/२०२६**

केशव बाळाभाऊ वंजारी

वय अं.७७ वर्ष, धंदा- शेती

रा.नरेंद्र नगर, नागपुर, ता.जि.नागपुर **अर्जदार**

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत बाळाभाऊ नत्थुजी वंजारी व कौशल्याबाई बाळाभाऊ वंजारी, रा.शेंदुरजनाघाट** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.९/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

क्लॉज २, बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये
वरुड येथील वि.वि.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश
(क.स्तर) यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९८७/२०२६ **ने.ता.१८/१२/२०२६**

१) सुगराबी अब्दुल अजित, वय अं.८७ वर्ष, धंदा-घरकाम, २) अब्दुल रशीद अब्दुल अजिज, वय अं.५७ वर्ष, धंदा- मजुरी, ३) अब्दुल रकीम अजिज, वय अं.५५ वर्ष, धंदा- मजुरी, ४) अमीना नौशाद अहमद, वय अं.५० वर्ष, धंदा- घरकाम, ५) साबेरा बि अब्दुल राऊफ, वय अं.५३ वर्ष, धंदा- मजुरी, ६) जाहीद परवेज अब्दुल रऊफ मंसुरी, वय अं.२५ वर्ष, धंदा- मजुरी, अर्जदार क्र.१ ते ६ रा.वरुड, ता.वरुड –**अर्जदार**

... विरुध्द ...

कोणी नाही **गैरअर्जदार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत अब्दुल अजीज शेख गुलाब, रा.वरुड** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात बॉम्बे क्लॉज २, रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारसप्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **३०/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड



सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव (क्विंटलमध्ये)

ज्वारी -	१६५० -	२०००
गहू -	२५०० -	३०००
तूर -	६१०० -	६३९०
मूग -	६५०० -	७०००
उडीद -	६००० -	७०००
हरभरा -	५६०० -	५९००
सोयाबिन -	४१०० -	४३५०
बाजरा -	२००० -	२३००
तिळ -	८२०० -	९३००
भुईमूग -	५१५० -	५३५०
मका -	२२०० -	२३००

ओबीसींमधील क्रिमी लेअर आरक्षणाच्या मुद्द्यावर केंद्र सरकारची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



मुंबई – ओबीसी आरक्षणांतर्गत 'क्रिमी लेअर' निश्चित करण्याच्या निकषांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला मोठा धक्का दिला आहे. न्यायालयाने केंद्र सरकारची याचिका फेटाळून लावली आणि आपला ११ मार्च २०२६ चा निर्णय कायम ठेवला. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, 'क्रिमी लेअर' निश्चित करण्यासाठी पालकांचे वेतन आणि कृषी उत्पन्न हे एकमेव निकष म्हणून वापरले जाऊ शकत नाहीत.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला निर्देश दिले आहेत की, नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होऊनही कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने ज्या पात्र उमेदवारांना चुकीने नियुक्ती नाकारली होती, त्यांची नियुक्ती करावी. यामध्ये आयएएस, आयपीएस, आयआरएस आणि इतर केंद्रीय सेवांसाठी निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश आहे, जे न्यायालयाच्या निर्धारित निकषांनुसार ओबीसी नॉन-क्रिमी लेअर प्रवर्गासाठी पात्र ठरतात. न्यायालयाच्या या आदेशानंतर, या प्रकरणाचे प्रतिनिधित्व करणारे वकील शशांक रत्नू यांनी ओबीसी समाजाचा एक मोठा विजय म्हटले आहे. ते म्हणाले की, यामुळे जवळपास एक दशकापासून सुरू असलेल्या अन्यायाला पूर्णविराम मिळाला आहे.

गौतम अदानी, प्रफुल पटेलांपासून संजय राऊतांपर्यंत...शरद पवारांच्या भेटीला कोणकोण रुग्णालयात पोहोचले?; राहुल गांधी, राज ठाकरेंसह कुणाचे फोन?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

मुंबई – राज्यातील दुष्काळी भागातील दौऱ्यावर असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची तब्येत बिघडली होती.


त्यांना कफ आणि अशक्तपणा जाणवू लागल्याने पुण्यातील रूबी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. कफ आणि अशक्तपणा असल्याने त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांच्या उपचारानंतर त्यांना डिस्चार्ज मिळाला. पुढील चाचण्यांसाठी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात नेण्यात आलं. शरद पवारांना आता भेटण्यासाठी अनेक नेते रूग्णालयात येत आहेत. काही नेत्यांनी त्यांना फोन करून तब्येतीची फोनवरून विचारपूस केली आहे.

यामध्ये त्यांचे जुने सहकारी, मित्र परिवार, राजकीय नेत्यांचा देखील समावेश आहे.

शरद पवार यांना भेटण्यासाठी काल (गुरूवारी, ता ५) राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि खासदार, तसेच जुने सहकारी प्रफुल्ल पटेल रूग्णालयात दाखल झाले. दोन्ही नेत्यांमध्ये बराच वेळ विविध विषयांवर चर्चा झाली. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील काल भेट घेतल्याची माहिती आहे.

पूर्णेकर प्रकरणात महत्त्वाची अपडेट : तातडीच्या सुनावणीची मागणी उच्च न्यायालयाने नाकारली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



ठाणे – शहराच्या मानपाडा परिसरातील शिवेसना उबाठा पक्षाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्याप्रकरणावरुन राजकारण चांगलच तापलं आहे. तर दुसरीकडे प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्येप्रकरणी मुलगा राम पुर्णेकरने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत निष्पक्ष चौकशीसाठी तपास स्वतंत्र यंत्रणेकडे वर्ग करण्याची मागणी केली आहे. तसेच राजेंद्र शिंदेंचा जबाब रेकॉर्डवर ठेवण्याचीही राम पुर्णेकर यांची मागणी आहे. आत्तापर्यंतच्या तपासावर सवाल उपस्थित करत मारेकऱ्यांचे हल्ला करताना परिधान केलेले कपडे जप्त करण्यात एसआयटीला अपयश आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. असं असताना प्रदीप पूर्णेकर हत्येप्रकरणी तातडीच्या सुनावणीची मागणी उच्च न्यायालयाने नाकारली असल्याची माहिती समोर आली आहे.

दुष्काळ परिस्थिती समन्वय समितीची आढावा बैठक संपन्न

पाणीटंचाई, चारा टंचाई आणि मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी दुष्काळ परिस्थिती समन्वय समितीची आढावा बैठक आमदार चंदूभाऊ यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली मोर्शी तहसील कार्यालयाचे सभागृहात आज रोजी पार पडली.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, तहसीलदार सागर ढवळे, गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, तालुका कृषी अधिकारी प्रथमेश माने, मोर्शी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पराग वानखडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता बोडखे, पशुधन विकास अधिकारी, वीज वितरण कंपनीचे अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते ज्योती प्रसाद मालवीय, नितीन उमाळे, नितीन राऊत, सतीश लेकुरवाडे, श्रीकृष्ण ढाकुलकर, हर्षल चौधरी, घनश्याम सिंगरवाडे, सागर पाटील, गोपाल टाकळे तसेच महिला कार्यकर्त्या सुद्धा उपस्थित होत्या. बैठकीदरम्यान तालुक्यातील सद्यस्थितीतील दुष्काळी परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ग्रामीण भागात निर्माण होणारी पाणीटंचाई, जनावरांसाठी चारा उपलब्धतेचा प्रश्न तसेच शेतकरी व शेतमजुरांना रोजगार हमी योजनेंतर्गत कामे उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांना चारा आणि मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, तसेच संभाव्य टंचाई परिस्थितीवर वेळीच उपाययोजना कराव्यात, याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. या बैठकीत ग्रामीण भागातून आलेला नागरिकांनी आपापल्या सूचना मांडल्या.

दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा मिळावा आणि प्रशासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय राहून टंचाई निवारणाची कामे प्रभावीपणे राबविता यावीत, हा या बैठकीचा मुख्य उद्देश होता.

मोर्शी शहरात फटाके फोडण्यावर निर्बंध : नियमांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई

नगरपरिषदेची सार्वजनिक सूचना : पर्यावरण व नागरिकांच्या आरोग्याच्या रक्षणासाठी कडक नियम लागू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मोर्शी – मोर्शी शहरातील पर्यावरणाचे संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने नगर परिषद मोर्शीच्या वतीने नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण सार्वजनिक सूचना जारी करण्यात आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्र. ०१/२०२६ मधील दि. २२ सप्टेंबर २०२६ व १५ ऑक्टोबर २०२६ च्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार शहरात फटाके फोडणे, ध्वनिप्रदूषण आणि प्रकाशप्रदूषणाबाबत कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

नगरपरिषद प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार रस्ते, रस्त्यांचे मार्ग, गल्ल्या आणि पदपथांसह सर्व सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास पूर्णतः प्रतिबंध करण्यात आला आहे. ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी ५-ई(ए) मानकांनुसार फक्त कमी आवाजाचे फटाके वापरण्याचे निर्देश असून, रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाज करणाऱ्या फटाक्यांचा वापर सक्त मनाई आहे. कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात अथवा फटाक्यांच्या ठिकाणी ध्वनी पातळी मोजणारी उपकरणे आवश्यक करण्यात आली आहेत. खासगी आवाजवर्धकांनाही निर्धारित आदेशांचे पालन करणे बंधनकारक आहे. वरील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध ध्वनिप्रदूषण नियम, पर्यावरण संरक्षण कायदा, भारतीय न्याय संहिता २०२३ तसेच स्फोटक कायदा १८८४ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा नगरपरिषद प्रशासनाने दिला आहे.भारतीय संविधानाच्या कलम ५१(अ) नुसार पर्यावरणाचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे मोर्शी शहरातील सर्व नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करून सण-उत्सव सुरक्षित, शांततापूर्ण आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करावेत, असे आवाहन नगर परिषद मोर्शीच्या वतीने करण्यात आले आहे.



